# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई — ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-२६४७८७९५ / ५३१/ २९६/ २६४७०९१६ (वै.) फॅक्स : ०२२-२६४७३९७९

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-५०/समुपदेशन कक्ष/२०१९-२०/३१०० दिनांक : 7 MAY 2019

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद

मान्यता प्राप्त पदविका अभ्यासक्रम राबविणा-या

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

विषय :- **तंत्रनिकेतनांमध्ये समुपदेशन कक्ष (counseling cell) स्थापन करणेबाबत.**

राज्यातील शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण विद्यार्थी तंत्रनिकेतनामध्ये अधिकाधिक प्रवेशीत होण्याकरिता मंडळामार्फत प्रत्येक जिल्ह्यात मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असते. तरीही राज्यातील तंत्रनिकेतनामध्ये मागील ३ वर्षाच्या कालावधीत कमी होत असलेल्या प्रवेशीत विद्यार्थी संख्येच्या पार्श्वभूमीवर, प्रत्येक तंत्रनिकेतनांमध्ये विद्यार्थी व पालकांना सुयोग्य मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे गरजेचे झाले आहे.

त्यानुसार अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व तंत्रनिकेतांना त्यांच्या परिसरात एक समुपदेशन कक्ष स्थापन करुन पदविका अभ्यासक्रम व प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थी व पालकांना योग्य माहिती देऊन मार्गदर्शन करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

विद्यार्थी व पालकांच्या योग्य समुपदेशनासाठी खालील बाबींचा अवलंब करावा.

१. समुपदेशन कक्ष मुख्यत: संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ चांगल्या हवेशीर खोलीमध्ये असावा व त्यामध्ये सुयोग्य बैठक व्यवस्था असावी.

२. पदविका अभ्यासक्रमामुळे उपलब्ध होणा-या संधीबाबतची माहिती करुन देण्याकरिता, पदविका प्रवेश प्रक्रियेची अचूक माहिती असलेल्या किमान दोन (२) अधिव्याख्यात्यांची नियुक्ती समुपदेशन कक्षाकरिता करावी.

३. समुपदेशन कक्षामध्ये विविध पदविका अभ्यासक्रम, भविष्यातील संधी, माजी विद्यार्थी यशोगाथा, नोकर भरतीच्या संधी, शिष्यवृत्ती, उच्च शिक्षण यासंबंधीची माहिती दर्शविणारे फलक (पोस्टर) प्रदर्शित करावे. तसेच याबाबतीत सादरीकरण (presentation) करावे.

४. समुदेशनासाठी येणा-या विद्यार्थ्यांची नोंद केंद्रात ठेवल्या जाणा-या नोंदवहीत ठेवाव्यात.

५. विद्यार्थ्यांना प्रवेशासंबंधीच्या तसेच करिअर संबंधित असलेल्या शंकांचे यथायोग्य निरसन करुन त्यांना समजण्याजोग्या स्थानिक भाषेत (शक्यतो मराठी) मार्गदर्शन करावे.

६. आवश्यक माहिती पत्रके, मंडळ / विभागीय कार्यालयाकडून वितरित करण्यात येणारी माहिती पुस्तके यांचे विद्यार्थ्यांना विनामुल्य वाटप करावे.

७. विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची तसेच प्रवेशासंबंधीच्या सर्व राऊंडबाबतची माहिती दयावी.

८. समुपदेशकांनी समुपदेशन झाल्यावर विद्यार्थी व पालकांना पदविका अभ्यासक्रमांच्या अधिक माहितीसाठी www.msbte.org.in या संकेतस्थळाला व प्रवेशाबाबतच्या माहितीसाठी www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याचा सल्ला दयावा.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीकरिता –

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर.